# ३. इन्दियसंवरसील

**प्रस्तावना**

पालि तिपिटकातील अनेक ग्रंथावर विस्तृत पालि भाष्य लिहिणारा भाष्यकार म्हणजे पालि अट्ठकथाकर म्हणून आचार्य बुद्धघोष प्रसिद्ध आहेत. बौद्ध तत्त्वज्ञानाविषयी विसुद्धिमग्ग नावाचा एक उत्कृष्ट स्वतंत्र ग्रंथही त्यांनी लिहिलेला आहे. त्यातूनच प्रस्तुत उतारा घेतला आहे. इंद्रिय संवरसुद्धि अर्थात शारीरिक इंद्रियाचे शुद्धीकरण. जसे मोकळे द्वार असलेले गाव लुटारुंच्या साहाय्याने लुटले जाते, चांगल्या प्रकारे न साकारलेल्या घरात पावसाचे पाणी प्रवेश करते त्याचप्रमाणे असावध मनामध्ये राग, द्वेष, मत्सर इत्यादी वाईट विचार प्रवेश करतात. कुशल विचाराला गती देणे आणि अकुशल विचाराला प्रवेश करू न देणे. जसे पाणी शुद्ध करण्यासाठी तुरटीची गरज असते अगदी त्याप्रमाणे इंद्रियांच्या शुद्धीकरणासाठी लोककल्याणाला प्रोत्साहित करणारी समाजव्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. याविषयीचे वर्णन प्रस्तुत कवितेत आलेले आहे.

रूपेसु सद्देसु अथो रसेसु, गन्धेसु फस्सेसु च रक्ख इन्दियं ।
एते हि द्वारा विवटा अरक्खिता, हनन्ति गामं व परस्स हारिनो ।।१।।



यथा अगारं दुच्छिन्नं, वुट्ठि समतिविज्झति ।
एवं अभावितं चित्तं, रागो समतिविज्झति।।२।।

रुपेसु सद्देसु अथो रसेसु, गन्धेसु फस्सेसु च रक्ख इन्दियं ।
एतेहि द्वारा पिहिता सुसंवुता, न हनन्ति गामंव परस्स हारिनो ।।३।।



यथा अगारं सुच्छिन्नं, वुठ्ठि न समतिविज्झति ।
एवं सुभावितं चित्तं, रागो न समतिविज्झति ।।४।।

कामरागेन डय्हामि, चित्तं मे परिडय्हति।
साधु निब्बाणं ब्रूहि, अनुकम्पाय गोतमा ति ।।५।।

सञ्ञाय विपरियेसा, चित्तं ते परिडय्हति ।
निमितं परिवज्जेहि, सुभं रागपसय्हितं।
असुभाय चित्तं भावेहि, एकग्गं सुसमाहितं ।।६।।

संखारे परतो पस्स, दुक्खतो नो च अत्ततो ।
निब्बापेहि महारागं, मा डय्हित्थो पुनप्पुनन्ति ।।७।।

मक्कटोव अरञ्ञम्हि, वने भन्तमिगो विय।
बालो विय च उत्तस्तो, न भवे लोललोचनो ।।८।।

अधो खिपेय्य चक्खुनि, युगमत्तदसो सिया ।
वनमक्कटलोलस्स, न चित्तस्स वसं वजे ।।९।।

कुलपुत्तमानि अञ्ञोपि, पब्बजित्वान सासने।
मिच्चथेरो व तिट्ठेय्य, वरे इन्दिय सवरे ।।१०।।

(विसुध्दिमग्गो)

---

## शब्दार्थ

**इन्दियं (नपु.)–** इंद्रिय, अवयव (डोळा, कान, नाक, जीभ, त्वचा)
**अरक्खिता (वि.)–** असुरक्षित
**विवटा (कृ.)–** आवरणरहित, उघडा
**अरञ्ञम्हि (पु.)–** अरण्यात, वनामध्ये
**कामरागेन (पु.)–** कामरागाद्वारे
**पिहित (कृ.)–** झाकलेला
**खिप्प (वि.)–** लवकर, ताबडतोब, शीघ्र
**चित्तस्स (नपु.)–** मनाचे
**वुट्ठि (स्त्री.)–** वर्षा, पाऊस
**अगारं (नपु.)–** घर, निवासस्थान
**उय्हामि (क्रि.)–** मी जाळतो
**अनुकम्पाय –** अनुकंपा करण्यासाठी (आज्ञार्थी)
**कुलपुत्तं (पु.)–** कुलपुत्राला
**चक्खु (नपु.)–** डोळा
**निमित्तं (क्रि.)–** निमित्त, कारण

---

## स्वाध्याय

**१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) घराला दरवाजा नसल्यास काय होते?
२) घर योग्य प्रकारे शाकारलेले नसल्यास काय होते?
३) मनामध्ये राग केव्हा प्रवेश करत नाही?
४) जिभेचे कार्य कोणते?
५) मन कशाने जळते?
६) संस्कारांना कशाप्रकारे समजावे?
७) व्यक्तीने पुन्हा पुन्हा कशाला प्राप्त करू नये?
८) बुद्धसासनामध्ये कोणी प्रव्रर्जीत व्हावे?

**२. सत्य / असत्य लिहा.**

१) एवं अभावितं चित्तं समतिविज्झति।
२) रूपेसु, सद्देसु अथो रसेसु गन्धेसु फस्सेसु च रक्ख इन्दिय।

३) यथा अगारं सुच्छन्नं वुट्ठि समतिविज्झति।

४) सञ्ञाय विपरियेससा, चित्तं ते परिडय्हति ।

५) वनमक्कटलोलस्स चित्तस्स वसं वजे।

६) मिच्चथेरो व तिट्ठेय्य वरे इन्दिय सवरे ।

## ३. सूचनेनुसार कृती करा

**१) रूपे ओळखा.**

| | |
|---|---|
| हनन्ति | उय्हामि |
| पुनप्पुनन्ति | पब्बजित्वान |

**२) संधी सोडवा.**

| | |
|---|---|
| पर + अस्स | अन + उकम्पाय |
| चित्त + अस्स | |

**३) माध्यम भाषेत अर्थ लिहा.**

| | |
|---|---|
| फस्स | मक्कटो |
| एकग्गं | बालो |


## ४. वाक्ये पूर्ण करा.

१) कामरागेन उय्हामि, ...........मे परिडय्हति।

२) निमितं परिवज्जेहि, .......... रागपसय्हितं ।

३) कुलपुत्तमानि .........., पब्बजित्वान सासने।

## ५. जाळेरेखाचित्र पूर्ण करा.




☆☆☆